दै. आनंदनगरी दि. 03/03/2024

# हतुक शाखेने २९ दिवसात
# लाख १२ हजार दंड ठोठावला

प्रतिनिधी)-फेब्रुवारी
२९ दिवसात नांदेड
वाहतुक शाखा क्रमांक
बादने ७ हजार ८००
हन कायद्याचे केसेस
च्यावर ८१ लाख १२
० रुपयांचा
ठावला आहे. या
कांकडून पोलीसांनी ३२
हजार १०० रुपये एवढी
रूनपण घेतली आहे.
हिती वाहतुक शाखा क्रम
पोलीस निरिक्षक सुर्यम
लमवाड यांनी प्रसिध्दी
पाठविली आहे.
लीस अधिक्षक श्रीकृष्ण
अपर पोलीस अधिक्षक
कुमार यांनी वेळोवेळी
आदेशाला अनुसरून
हरातील वाहतूक शाखा
१ वजिराबाद यांनी
महिन्याच्या २९ दिवसांम
कीच्या पध्दतीने वाहन
करणे, मोटार वाहन कायदा



मोडणे, सायलेंसर मॉडीफाईड करून वापरणे अशा विविध कारणांसाठी वजिराबाद वाहतुक शाखेच्या हद्दीत एकूण ७ हजार ८०० वाहनांविरुध्द कार्यवाही केली. या कार्यवाहीतून मोटार वाहन कायद्याला अभिप्रेत नियम प्रमाणे ८१ लाख १२ हजार २०० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. त्यातून ३२ लाख २२ हजार १०० रुपये एवढ्या रक्कमेची वसुली सुध्दा करण्यात आली. बुलेट गाडीचे सायलेंसर मॉडीफाईड करणाऱ्या ७१ जणांविरुध्द या २९ दिवसांमध्ये कार्यवाही करण्यात आली आहे. बहुदा वाहतुक शाखेने २९ दिवसांमध्ये एवढी मोठी कार्यवाही करण्याची ही पहिलीच वेळ असेल. या प्रसिध्दीपत्रकासोबत पोलीस निरिक्षक **सुर्यमोहन** बोलमवाड यांनी जनतेला **आवाहन** केले आहे की, कोणीही मोटार वाहन कायद्याच्या नियमांना न मोडता आपल्या वाहनांचे चालन करावेत. जेणे करून मोटारवाहन चालक, धारक यांच्याविरुध्द दंडात्मक कार्यवाही होणार नाही.

---

दै. देशोन्नती

### एका महिन्यात केला

# वाहतूक शाखेने ८१ लाख रुपये दंड वसूल



देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ▪ वजीराबादच्या शहर वाहतूक शाखेने एका महिन्यात ८१ लाख १२ हजार २०० दंड आकारण्यात आल्याची माहिती पोलिस निरीक्षक सुर्यमोहन बोलमवाड यांनी दिली आहे.

शहरातील वाहतूक विस्कळीत होत असून वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहन चालकावर कारवाई करण्याचे निर्देश पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे व अप्पर पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी वाहतूक शाखेला दिले होते. त्यानुसार वाहतूक शाखेचे पोलिस निरीक्षक सुर्यमोहन बोलमवाड यांनी फेब्रुवारी महिन्यात वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या ७ हजार ८०० वाहन चालकांवर कारवाई करून ८१ लाख १२ हजार २०० रुपये दंड आकारण्यात आला आहे. त्यापैकी ३ हजार ३५७ वाहन धारकांकडून ३२ लाख २२ हजार १०० रुपये दंड वसूल करण्यात आला असून तो शासनाकडे जमा करण्यात आला आहे, तसेच मोडिफॉय सायलेन्सर वापरणाऱ्या ७१ वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आल्याचे पोनि बोलमवाड यांनी सांगितले.

---

नं.

Date of C
समाप्ती

4.

Total Papers
एकूण कागद